International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 42 November - December - 2025

# भारतीय उद्योजकांसाठी असणाऱ्या योजना

**डॉ. अर्चना अ. विखे**

*सहाय्यक प्राध्यापक,*

*वाणिज्य विभाग, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय कोल्हार.*

*Corresponding Author – डॉ. अर्चना अ. विखे*

**DOI - 10.5281/zenodo.17970848**

**सारांश:**

*मागील चार दशकापासून उद्योजकतेचे महत्त्व वाढले आहे. भारताची अर्थव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर उद्योजकतेची आवश्यकता आहे. देशाच्या आर्थिक विकासात आणि उत्पन्नामध्ये उद्योजकतेचा खूप मोठा हिस्सा आहे. उद्योजकता ही संकल्पना स्वतःच्या व्यवसायाची स्थापना आणि व्यवस्थापन करण्यासाठी असते. रोजगार आणि व्यवसायाच्या संधी निर्माण करणे आणि त्यांचा विस्तार करणे हे देखील उद्योजकाच काम आहे. उद्योजक नवीन वस्तू आणि सेवांचे उत्पादन करणे , बाजारपेठेतील मागणी पूर्ण करणे, लक्ष ग्राहकांसाठी उत्पदान निर्माण करत असतात. उद्योजक नवनिर्मिती करताना अनेक जोखीम व्यवसायातील धोके पत्करतात आणि आपल्या कौशल्याने समस्या व अडचणी सोडवितात. कोणताही देश विकसित असो किंवा विकसनशील असो त्या देशासाठी उद्योजकतेची गरज असते.*

*या संशोधन पेपर मध्ये उद्योजकता, उद्योजकतेच्या संकल्पनेवरून त्यांच्या वैशिठ्यांचा अभ्यास, तसेच देशाच्या व समाजाच्या विकासामध्ये उद्योजकतेचे महत्त्व आणि भारतातील उद्योजकांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती अभ्यासली आहे.*

***Keywords:* उद्योजक, उद्योजकता.**

**प्रस्तावना:**

उद्योजकतेची संकल्पना उद्योजक व उद्योजकता या दोन्ही संकल्पना वेगवेगळ्या आहेत. उद्योजक म्हणजे जोखीम स्वीकारणारा अस्तित्वात असलेले व्यवसाय न करता वेगळा नाविन्यपूर्ण व्यवसाय करणारी व्यक्ती होय. तर उद्योजकता ही उद्योजकाने चालविलेली प्रक्रिया आहे. नफा मिळविण्यासाठी उपलब्ध असलेल्या संधीचा व्यवसाय करण्याच्या माध्यमातून फायदा करणे म्हणजे उद्योजकता होय. उद्योजकता आणि उद्योजक मध्ये प्रकल्प आखणी करणे, उद्योगाचा परवाना मिळविणे, भांडवलाची रचना करणे, प्रकल्पाची रचना करणे, उत्पादन घटकांचे जुळवाजुळव करणे, वस्तू आणि सेवांचे व्यवस्थितपणे विपणन करणे यांचा सर्वांचा समावेश होतो. शुम्पीटर यांच्या मते उद्योजक हा नवनिर्मितीद्वारे आर्थिक विकासाला गती देतो. नवीन उपक्रम स्थापन करण्याची, त्याचे योग्य रीतीने संचालन करण्याची आणि यशस्वी होण्याची क्षमता आणि इच्छा ज्यामध्ये असते तो उद्योजक होतो. यामध्ये तो जोखीम पत्करून नफा मिळवितो.

उद्योजकतेच्या कार्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश असतो.

- उद्योजक बाजारपेठेतील संधी ओळखून नवीन उत्पादने, सेवा आणि प्रक्रिया तयार करून नवनिर्मिती करतात.
- उद्योजक नफा वाढीसाठी आर्थिक आणि व्यावसायिक जोखीम स्वीकारतात..
- व्यवसायाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी भांडवल, श्रम आणि तंत्रज्ञानासह संसाधनाचे कार्यक्षमतेनेचे व्यवस्थापन करतात.
- उद्योजक व्यवसायाची दिशा व कार्यप्रणालीसाठी महत्त्वाचे निर्णय घेतात.
- व्यावसायिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संघटनेचे नेतृत्व करतात.
- व्यावसायिक दृष्टिकोन वास्तव्यात बदलण्यासाठी व्यावसायिक धोरणे तयार करतात.

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

१. उद्योजकतेची वैशिष्ठये अभ्यासणे.

२. देशाच्या व समाजाच्या विकासामध्ये उद्योजकतेचे महत्त्व अभ्यासणे.

३. भारतातील उद्योजकांसाठी असलेल्या विविध योजना अभ्यासणे.

**संशोधन पद्धती**:

या संशोधन पेपर मधील सर्व माहिती द्वितीय साधनांद्वारे गोळा केलेली आहे. या संशोधनासाठी पुस्तके राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय जर्नल्स आणि वेबसाईट द्वारे माहितीचे संकलन केले आहे.

**उद्योजकतेची वैशिष्ट्ये:**

उद्योजकांच्या गुण आणि कौशल्यामुळे त्यांना व्यवसायात यश मिळते हे यश मिळविण्यासाठी ते उद्योगातील जोखीम पत्करतात, उद्योग व्यवसायाचे दीर्घकालीन नियोजन करतात .

१. नवनिर्मिती: नवनिर्मितीमुळे देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळते नवनवीन वस्तूंची निर्मिती, कच्च्या मालाचे नवीन मार्ग, नवीन बाजारपेठांचा शोध, नवीन संघटन रचना, उत्पादनाच्या नवीन पद्धती यांचा नवनिर्मिती मध्ये समावेश होतो.

२. जोखीम पत्करणे: बाजारपेठेतील तीव्र, स्पर्धा ग्राहकांच्या बदलत्या आवडीनिवडी, सरकारची बदलती धोरणे, तंत्रज्ञानातील बदल यामुळे उद्योजकाला अनिश्चित जोखीम स्वीकाराव्या लागतात.

३. निर्णय प्रक्रिया: भांडवल, मनुष्यबळ, विपणन व्यवस्थापन या बाबतीत निर्णय हे वेळेवर व योग्य घेतले तरच उद्योजकतेचे यश मिळते.

४. गतिमान प्रक्रिया: परिस्थिती व काळानुसार उद्योजकतेमध्ये बदल केल्यामुळे स्पर्धकांना सहज तोंड देता येते.

५. संधी शोध: परिस्थितीचा सूक्ष्म रीतीने अभ्यास व निरीक्षण करून व्यवसायाच्या संधीचा शोध उद्योजक घेत असतात.

६. संघटन प्रक्रिया: नवीन उपक्रम निर्माण करण्याच्या दृष्टीने विविध घटक संघटित करून उद्योजक तत्परतेने व कार्यक्षमतेने उपक्रमांची उभारणी करतो.

७. व्यवस्थापन करणे: भौतिक, वित्तीय व मानवी साधनसामग्रीचे व्यवस्थापन केले तर उद्योग यशस्वी ठरतो.

८. आव्हाने स्वीकारणे: खुल्या आर्थिक धोरणांमुळे आणि वेगाने बदलणाऱ्या परिस्थितीमुळे नवीन बाजारपेठा काबीज करणे, वस्तूमध्ये वारंवार बदल करणे व जागतिक स्पर्धेत टिकून राहणे ही आव्हाने स्वीकारावी लागतात.

**देशाच्या व समाजाच्या विकासामध्ये उद्योजकतेचे महत्त्व:**

- नवनिर्मिती नवनवीन कल्पना प्रत्यक्षात उतरून वस्तू व सेवांची निर्मिती करून ती ग्राहकांपर्यंत पोहोचविणे.
- संपत्तीची निर्मिती भौतिक व मानवी साधन संपत्तीचा वापर करून उद्योग व्यवसायात वाढ करणे.
- रोजगार निर्मिती उद्योग व्यवसायामुळे अनेक व्यक्तींना रोजगार उपलब्ध होतो किंवा रोजगाराच्या नवनवीन संधी निर्माण होतात.
- उद्योजकतेसाठी बँकेकडून कर्ज शेअर बाजारातून भाग भांडवल गोळा करावे लागते.
- बाजारपेठेचा अभ्यास करून विपणन विषयक धोरणे उद्योजकतेमध्ये आखणी करणे
- उपलब्ध साधन सामग्रीचा महत्तम वापर करणे.
- उद्योगांच्या विकासामुळे रोजगार निर्मिती वाढून समाजाचे राहणीमान उंचावते.
- उद्योजकमुळे दर्जेदार वस्तूंचे उत्पादन तयार करून आंतरराष्ट्रीय बाजारपेठ काबीज करता येते.
- उद्योजकता वाढीमुळे समाजातील प्रत्येक स्तरावरील व्यक्ती सूक्ष्म, लघु व मध्यम स्वरूपाचे उद्योग स्थापन करतात त्यामुळे संपत्ती निर्माण होऊन आर्थिक विषमता दूर होते.
- उद्योजकतेमुळे उत्पादनाच्या निर्यातीत वाढ होते त्यामुळे परकीय चलनाचा साठा वाढतो.
- उद्योजकतेमुळे देशाच्या मागास व ग्रामीण भागाचा विकास करता येतो.

**भारतीय उद्योजकांसाठी असणाऱ्या निरनिराळ्या योजना:**

उद्योजकांसाठी व्यवसाय करण्यासाठी व तो व्यवसाय वाढविण्यासाठी तसेच सरकारी मदत, मार्गदर्शन प्रोत्साहने मिळविण्यासाठी खालील योजना सहाय्य करतात.

**प्रमुख योजना :**

- **स्टार्ट अप इंडिया:** हि भारत सरकारची एक प्रमुख योजना १६ जानेवारी २०१६ रोजी सुरु करण्यात आली.. या योजनेचा उद्देश नावोन्मेष आणि स्टार्ट उप संस्कृतीला प्रोत्साहन देणे, युवकांना स्टार्टअप करण्यासाठी प्रोत्साहित करणे, रोजगार वाढवणे, नवोन्मेषासाठी इको सिस्टम तयार करणे तसेच आर्थिक सहाय्य करणे, मार्गदर्शन केले जाते आणि पेटंट दाखल करण्यासाठी मदत केली जाते.
- **पंतप्रधान मुद्रा योजना:** ८ एप्रिल, २०१५ रोजी सुरु झालेली हि भारत सरकारची योजना सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (MSMEs) विविध प्रकारच्या कर्जांसाठी (शिशु, किशोर, तरुण) अर्थ सहाय्य करते. या योजनेमध्ये उद्योजकांना कमी कागदपत्रासह आणि कमी व्याज दरामध्ये कर्ज मिळते. तसेच उद्योजकांसाठी त्वरित कर्जाच्या परतफेडीवर

व्याज सवलत देखील या योजनेत उपलब्ध आहे.

- **स्टँड-अप इंडिया:** ५ एप्रिल, २०१६ रोजी ही योजना भारत सरकारने अनुसूचित जाती जमाती तसेच महिला वर्गाला उद्योजक बनविण्यासाठी व त्यांना प्रोत्साहन देण्यासठी बनवली आहे. या योजनेंतर्गत अनुसूचित जाती जमाती व महिला उद्योजक नवीन व्यवसाय सुरू करता येतो. या योजनेंतर्गत उत्पादन, व्यापार आणि सेवांतर्गत नवीन उद्योग व्यवसाय सुरु करण्यासाठी रु. १० लाख ते रु. १ कोटीपर्यंतचे आर्थिक सहाय्य दिले जाते.
- **पीएम विश्वकर्मा योजना:** १७ सप्टेबर, २०२३ रोजी हया योजनेची स्थापना करण्यात आली. ही योजना पारंपरिक कुशल कारागीर आणि शिल्पकारांसाठी आहे. यांना प्रशिक्षण देणे, कमी व्याजदरात कर्ज देणे, त्यांच्या कारागिरीसाठी आधुनिक साधनांच्या खरेदीसाठी आर्थिक सहाय्य या योजनेद्वारे केले जाते तसेच त्यांच्या उत्पादनांची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि त्यांना जागतिक बाजारपेठेशी जोडण्यासाठी सुध्दा हि योजना मदत करते.
- **पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम:** ही भारत सरकारची योजना १५ ऑगस्ट,२००८ पासून सुरु करण्यात आली. ग्रामीण आणि शहरी भागातील बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी हि योजना आर्थिक सहाय्य देते. यामध्ये सेवा आणि उद्योग क्षेत्रांचा समावेश आहे.ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे होणारे स्थलांतर यामुळे थांबविले जाते.
- **जिल्हा उद्योग केंद्र:** हि केंद्र सरकारची १९७८ पासून सुरुवात केलेली योजना आहे. ग्रामीण भागातील ग्रामोद्योग, कुटिरोद्योग, लघुउद्योग यांना प्रोत्साहन देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा उद्योग केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे, जिल्हया मधील उद्योजकांना एकाच ठिकाणी सर्व आवश्यकसेवा सुविधा हे केंद्र पुरविते. ज्यामुळे नवीन आणि विद्यमान व्यवसाय वाढतात.

**इतर योजना:**

- **उद्योगिनी योजना:** ही योजना विशेषतः अनुसूचित जाती आणि जमातीमधील महिला उद्योजकांसाठी आहे,
- **क्रेडीट गॅरंटी फंड फॉर मायक्रो आणि स्मॉल एंटरप्रायझेस:** हि योजना सूक्ष्म, लघु आणि मध्यम MSMEs उद्योगांना जामीनशिवाय कर्ज मिळवण्यासाठी मदत करते.
- **अटल इनोव्हेशन मिशन:** भारतातील शाळांमध्ये अटल टिंकरिंग लॅब्स स्थापन करून नवोन्मेष आणि उद्योजकतेला प्रोत्साहन हा उपक्रम देत आहे . हे सेंटर्स स्टार्टअप्सला निधी उपलब्ध करून देणे, मार्गदर्शन करणे आणि इनक्युबेशन समर्थन सुध्दा हे करते.
- **स्किल इंडिया:** २०१५ मध्ये भारत सरकारने स्किल इंडिया ही योजना भारतातील तरुणांना तांत्रिक कौशल्य, प्रशिक्षण व रोजगार प्रदान करण्याच्या उद्देशाने स्थापन केली. आरोग्यसेवा, बांधकाम, उत्पादन आणि आतिथ्य अशा विविध क्षेत्रांमध्ये वेगवेगळे प्रशिक्षण कार्यक्रम हि योजना उपलब्ध करून देते.
- **डिजिटल इंडिया:** १ जुलै, २०१५ पासून डिजिटल इंडियाची सुरुवात भारतात झाली. या

उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे भारतामध्ये डिजिटली सक्षम समाज निर्मिती करणे होय. डिजिटल इंडिया हे ई-गव्हर्नन्स, डिजिटल पायाभूत सुविधा आणि डिजिटल साक्षरता सारख्या तीन प्रकारच्या सेवा प्रदान करते. देशातील प्रशासकीय सेवा इलेक्ट्रोनिक माध्यमातून नागरिकांपर्यंत याद्वारे पोहचवली जाते.

- **मेक इन इंडिया:** भारत देश जगातील औद्योगिक केंद्र बनावे आणि भारतामध्ये परकीय गुंतवणुकीचा ओघ वाढवा व त्यामुळे भारताची उत्पादन क्षमता वाढावी म्हणून हि योजना भारतात २५ सप्टेबर २०१४ रोजी अस्तित्वात आली आहे. ही योजना भारतातील उत्पादनांना चालना देते. भारतातील आणि भारताबाहेरील बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारतातच जास्तीत जास्त उत्पादन करण्यासाठी हि योजना प्रोत्साहित करते.
- **उद्योग आधार मेमोरँडम (UAM):** या योजनेद्वारे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (MSMEs) एक ऑनलाइन नोंदणी प्रणाली आहे. ज्याद्वारे व्यावसायांनासरकारी योजना आणि फायद्यासाठी पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुलभ पद्धतीने करता येते. यामुळे बँका आणि इतर वित्तीय संस्थांकडून तारण न देता कर्ज मिळविता येते. ट्रेडमार्क आणि पेटंट नोंदणी शुल्कामध्ये सूट मिळते.

## निष्कर्ष:

उद्योजकतेमध्ये गुणवत्ता, दर्जा, कार्यक्षमता यांचा समावेश झालेला आहे. परंतु यशस्वी उद्योजकतेमध्ये दर्जा आणि गुणांबरोबर मानवी मुल्यांची सुध्दा जपवणूक केली जाते. उद्योजाकता विकासामुळे देशाच्या आर्थिक वाढीवर आणि सामाजिक विकासावर आमुलाग्र असे परिणाम झालेले दिसून येतात. सध्याच्या भारत देशातील समतोल उद्योग व्यवसाय वाढीसाठी, उद्योजकांच्या शाश्वत विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी स्टार्ट अप इंडिया, मेक इन इंडिया अशी अनेक धोरणे आणि योजना भारत सरकार आखत आहेत. यामुळे देशाच्या आर्थिक व उद्योजक क्षेत्रावर सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. रोजगार वाढून नवनिर्मितीला चालना मिळत आहे.

## संदर्भ:


1. उद्योजकतेची मुलतत्वे- डॉ. जितेंद्र अहिरराव, कैलास प्रकाशन, औरंगाबाद.
2. https://www.researchgate.net
3. http://udyojak.org
4. http://www.startupindia.gov.in